**कृपया प्रसिध्दीसाठी -** **5 फेब्रुवारी 2012**

## पश्चिम रेल्वे लोकलसेवेचे नवे वेळापत्रक बनवा,
## चर्चगेट - डहाणू लोकल सुरु करा - राम नाईक यांची मागणी

**मुंबई, रविवार :** ''पश्चिम रेल्वेच्या लोकलसेवेचा विद्युत पुरवठा आता डी. सी. ऐवजी ए. सी. कर्षणामध्ये परिवर्तित झाला असल्यामुळे गाड्यांचा वेग दरताशी 80 किलोमिटरवरुन 100 किलोमिटर होणार आहे. गेल्या अनेक वर्षात लोकल गाड्यांच्या वेळापत्रकातच बदल करण्यात आला नव्हता, तो आता करुन नवे वेळापत्रक बनविण्यात यावे. तसेच चर्चगेट ते डहाणू असा ए. सी. विद्युतप्रवाह झाल्यामुळे थेट चर्चगेट - डहाणू लोकल गाड्या सुरु करण्यात याव्यात'' अशा दोन मागण्या माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) यांनी रविवारी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केल्या आहेत. श्री. नाईक यांच्या कार्यकालातच मुंबई रेल्वे विकास मंडळाची (एमआरव्हीसी) स्थापना होऊन वेगवेगळे प्रकल्प मंजूर झाले होते, त्यापैकीच डी. सी. चे ए. सी. परिवर्तन करण्याचा हा प्रकल्प होता.

दोन्ही मागण्यांच्यासंबंधी अधिक माहिती देतांना श्री. राम नाईक म्हणाले,. ''पश्चिम रेल्वेवरच्या काही गाड्या डी. सी. वर तर काही गाड्या ए. सी. वर चालत असल्यामुळे लोकल सेवेच्या गाड्यांचे धावण्याचे वेळा - पत्रक 80 किलोमिटरच्या आधारावर बनविले होते. एमआरव्हीसीची स्थापना करताना उपनगरी रेल्वेसाठी ए. सी. विद्युत् पुरवठा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट जून 2008 ठरले होते. ते आता साडेतीन वर्षानंतर पूर्ण होत आहे. या दिरंगाईमुळे प्रवाशांना अतोनात हाल सोसावे लागले. तथापि आता हे काम पूर्ण झाल्याचा प्रवाशांना फायदा तेव्हाच मिळेल जेव्हां सध्याच्या वेळापत्रकात बदल होईल. या शिवाय 80 चा वेग 100 कि. मी. होणे म्हणजे 25 टक्के वाढ होते. वेळेच्या होणा-या बचतीमुळे अधिक सेवा वाढविण्याची क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे सुधारित नवे वेळापत्रक तांतडीने बनविले पाहिजे. ते करतांना प्रवासी संघटनानाही विश्वासात घेण्यात यावे. चर्चगेट - विरार सिग्नल व्यवस्थेचेही अत्याधुनिकरण झाले असल्याने 100 कि. मी. च्या वेगाने गाड्या धावण्यात आता कोणतीही अडचण नाही''.

चर्चगेट - डहाणू थेट गाड्या सुरु करण्याच्या मागणीबद्दल श्री. राम नाईक म्हणाले, ''चर्चगेट ते डहाणू हा संपूर्ण मार्ग आता ए. सी. झाला आहे. तसेच रु. 56.70 कोटी खर्च करुन विरार - डहाणू रेल्वे मार्गाचे रुंदीकरणही पूर्ण झाले आहे. गाड्या धावण्याचा वेग 25 टक्क्याने वाढला असल्याने आता काही जास्तीचे रेक्सही (गाड्या) उपलब्ध होतील. त्यामुळे चर्चगेट - डहाणू थेट गाड्या सुरु न करण्यासाठी आता कोणतेही तांत्रिक कारण उरलेले नाही''.

''चर्चगेट - डहाणू लोकल सुरु करण्यासंबंधी रेल्वे मंत्री श्री. दिनेश त्रिवेदी यांची व्यक्तिशः दोन वेळा भेट घेऊन मी त्यांच्याशी चर्चा केली आहे. 15 मे 2011 रोजी नालासोपारा येथे झालेल्या प्रवासी परिषदेचीही त्यांना माहिती सांगितली होती. तसेच रेल्वे प्रशासन सांगत असलेल्या अडचणी या खोट्या सबबी आहेत हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. आता गरज आहे रेल्वे मंत्र्यानी राजकीय इच्छाशक्ति दाखवून निर्णय घेण्याची,'' असेही श्री. राम नाईक यांनी निवेदनाच्या शेवटी म्हटले आहे.

**(कार्यालय मंत्री)**